# प्रेस नोट

## युनिट ५, गुन्हे शाखा, पुणे शहर आयुक्तालय दिनांक १७/०५/२०१९

## राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २, सशस्त्र पोलीस भरती घोटाळयांतील मागील एक वर्षापासून फरारी असलेला आरोपी गुन्हे शाखेकडील युनिट-५ कडून जेरबंद

ली-०००---

राज्य राखीव पोलीस बल गट क्र २ पुणे येथे दि. १२/०३/२०१८ ते दिनांक २१/०४/२०१८ पर्यंत सशस्त्र पोलीस शिपाई या पदासाठी पोलीस भरतीच्या प्रक्रियेत राज्य राखीव पोलीस दलांतील काही पोलीसांनी व भरती प्रक्रियेकरिता उत्तरपत्रिका तपासणी कामी टेंडर दिलेले कंपनीकडील काही इसमांनी उमेदवारांचे निवड चाचणी प्रक्रियेतील लेखी परिक्षेतील उत्तर पत्रिकेमध्ये फेरफार व बनावटीकरण करुन त्यांचे गुण वाढविलेचे उघडकीस आलेने सदरबाबत राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ कडील अधिकारी यांनी तक्रार दिलेने वानवडी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं.१७४/२०१८ भा.दं.वि. क.४२०,४६५,४६८,४७१,१२०(ब),३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्हयाचा तपास श्री. दत्तात्रय लक्ष्मण चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट-५, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करीत आहोत.

दाखल गुन्हयाचे तपासांत यापुर्वी राज्य राखीव पोलीस दलांतील ०२ पोलीस कर्मचारी व ओएमआर शिट तपासणी करणारे ०२ इसम अटक करणेत आलेले आहेत. तसेच दाखल गुन्हयाचे तपासांत मुख्य आरोपी नामेः- प्रविण दत्तात्रय भटकर व त्याचे साथीदार नामेः-१) भुषण निरंजनराव देउलकर २) तेजस राजेंद्र नेमाडे हे मागील एक वर्षापासून फरारी होते. यातील मुख्य आरोपीचे वडील हे अमरावती येथे मयत झालेने तो तेथे येणार असलेबाबत माहिती मिळालेने तपासी अंमलदार यांनी सदर ठिकाणी टिम पाठविली असतां तेथे फरारी आरोपीपैकी आरोपीः- तेजस राजेंद्र नेमाडे वय २३ वर्षे धंदा शिक्षण सध्या बिल्डींग नं.१०२, उमेद अर्पामेंट,लगड मळा, लोकमत ऑफिस, सिंहगड रोड, पुणे मुळ रा.गायेंका नगर,कारंजा रोड,मुर्तीजापूर हा अकोला येथे मिळून आलेने त्यांस ताब्यांत घेवून आज दि.१७/०५/२०१९ रोजी अटक करणेत आलेली आहे. अटक मुदतीत त्यांस मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.लष्कर कोर्ट,पुणे (श्री.ओंकार साने )यांचे कोर्टात हजर केले असतां सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे यांनी बाजु मांडली. मा.न्यायालयाने सरकारी पक्ष व आरोपीचे वकील अशा दोन्ही पक्षाची बाजू ऐकून गुन्हयाचे गांभीर्य व व्याप्ती पाहुन आरोपींस दि.२४/०५/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली आहे. दाखल गुन्हयांतील फरारी आरोपी नामे १) प्रविण भटकर २) भुषण देउलकर यांचा शोध घेणेकामी पोलीस पथक रवाना केले आहे.

**सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, पुणे शहर श्री. प्रदीप देशपांडे मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. शिरिष सरदेशपांडे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ पुणे शहर, श्री. भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनांखाली युनिट-५ चे प्रभारी अधिकारी वपोनि श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी. भालचंद्र ढवळे, पो.उप.नि. शेंडगे, पोलीस स्टाफ सपोफौज लक्ष्मण शिंदे, संतोष मोहिते,समीर शेख,सचिन घोलप,राजेंद्र भोरडे,केरबा गलांडे,दया शेगर,अंकुश जोगदंडे,संजयकुमार दळवी यांनी ही कामगिरी केलेली आहे.**